# प्रेस नोट ता.२९/१/२०२०

## पिंपरी येथील जबरी चोरी व चोरीतील आरोपीस अहमदाबाद येथुन अटक

## पिंपरी चिंचवड विशेष तपास पथकाची (ए.टी.एम. एस.आय.टी) कामगिरी




सोने व्यवसायीक श्री.रवि अमिचंद मेहता, वय ७१ वर्षे, धंदा- सोनार, रा.अजनाला, जि.अमृतसर, राज्य पंजाब हे आपल्या जवळ सोन्याच्या मोरण्या घेवुन त्याची विक्री पंजाब, राजस्थान, गुरजरात व महाराष्ट्र येथील सोने व्यवसायीक दुकानदाराकडे जावुन अनेक राज्यामध्ये फिरून सोन्याच्या मोरणी विकण्याचा व्यवसाय करीत असतात. ते दि.२५/१२/२०१९ रोजी सकाळी १०.१५ वा. चे सुमारास त्यांच्या जवळील सोन्याच्या ४०० ग्रॅम वजनाच्या मोरणी ४,००,०००/-रू. च्या व मोरणी विक्रीचे रोख रक्कम २,८०,०००/- रू असे एकुण ६,८०,०००/- रू. असलेली बॅग घेवुन पिंपरी चौक, पिंपरी मेन रोडवरून चालत जात असताना पाठीमागुन एका दुचाकीवर दोन अनोळखी इसम येवुन पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या खांद्यास अडकवलेली सॅग बॅग जोरात हिसका मारून जबरदस्तीने पळुन घेवुन गेले होते त्यात फिर्यादी खाली पडुन गंभीर जखमी झाले होते. सदर घटनेबाबत त्यांनी पिंपरी पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरूध्द गु.रजि.नं. १२१५/२०१९ भादवि कलम ३९२,३४ अन्वये जबरी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन व गुन्हे शाखे कडील **विशेष तपास पथक** समांतर तपास करीत असताना घटनास्थळा वरील व फिर्यादी राहत असलेल्या लॉज व परीसरातील सी.सी.टि.व्ही. फुटेज व रोडवरील सी.सी.टि.व्ही फुटेज वरून आरोपींचा येरवडा पर्यंत माग काढुन सदरचे सर्व फुटेज प्राप्त करून फुटेजमध्ये दिसणाऱ्या इसमांचे फोटो व्यवस्थित क्लिअर करून ते फोटो **महाराष्ट्र क्राईम डिटेक्शन गृप व नॅशनल क्राईम डिटेक्शन गृप** तसेच इतर व्हाट्सॲप गृपवर टाकुन आरोपी बाबत अधिक माहिती प्राप्त करून बातमीदारास त्याबाबत माहिती दिली. बातमीदाराने फोन करून सदरचे आरोपी हे गुजराथ राज्यातील अहमदाबाद येथील असावेत असा संशय व्यक्त केल्याने गुजराथ राज्यातील व इतर शहरातील इकडे राहणारे इसम यांना समक्ष बोलावुन अहमदाबाद येथील बातमीदार तयार करून त्यास सदरचे फोटो मोबाईलव्दारे पाठवुन माहिती घेण्यास सांगितली होती. तसेच गुजराथ राज्यातील गुन्हे शाखेच्या सुरत, अहमदाबाद व राजस्थानातील देखील पथकातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन माहिती देण्यात आली होती.

त्यानंतर सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील, श्रीधर जाधव व विशेष तपास पथकाचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांनी मा.पोलीस आयुक्त, अपर पोलीस अयुक्त व पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांचेशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन घेवुन त्यांचे परवानगीने विशेष तपास पथकातील **सहायक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे व पोलीस कर्मचारी महादेव जावळे, सोमनाथ बोराडे, नितीन खेसे, विशाल भोईर, कबीर पिंजारी, पंकज भदाने** यांना वेळोवळी योग्य ते मार्गदर्शन करून दि.२२/०१/२०२० रोजी अहमदाबाद शहराकडे रवाना केले. सदरची टिम ही दि.२२/०१/२०२० ते दि.२७/०१/२०२० रोजी पर्यंत सलग ५ दिवस अहमदाबाद शहरात राहुन बातमीदारास भेटुन आरोपी बाबत शहानिशा करून आरोपींची रात्रीची घरे शोधुन स्थानिक पोलीसांना कल्पना देवुन अहमदाबाद गुजराथ येथील छारानगर, कुबेरनगर येथे छापा मारून आरोपी **रोहीत ऊर्फ कालू दलपत घमंडे, वय ३० वर्षे,** यास ताब्यात घेतले. त्याचेकडे तपास करता सी.सी.टि.व्ही. फुटेजमध्ये गाडीवर पाठीमागे बसलेला तो व गाडी चालवित असलेला त्याचा साथीदार असल्याचे सांगुन गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडे गुन्ह्यातील चोरलेल्या **मालापैकी २१० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या मोरणी** व गुन्ह्याचे वेळेस अंगावर असलेली कपडे जप्त करण्यात आली आहेत. सदर आरोपींना दि.२८/०१/२०२० रोजी न्यायालयात हजर केले असता त्याचा दि.०१/०२/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

आरोपीकडे अधिक माहिती घेता फिर्यादी श्री.रवि अमिचंद मेहता यांचा सोन्याच्या मोरणी विकण्यासाठी अहमदाबाद येथे गेले असताना यातील आरोपी व त्याचे चार साथीदार यांनी त्यांचे बाबत माहिती घेवुन त्यांचा अहमदाबाद येथुन पाठलाग करत पिंपरी येथे आले होते व ते येरवडा येथे राहणेस होता. फिर्यादी मेहता हे राहणेस असलेल्या पिंपरी येथील रत्ना लॉजचे बाहेर आरोपी यांनी दोन सलग दिवस पाळत ठेवुन होते. आरोपींनी गुन्हा केला त्या दिवशी आरोपी व त्याचे साथीदार लॉजचे बाहेर थांबले असताना फिर्यादी यांना त्यांचे रूममध्ये जावुन लुटण्याचा प्लॅन करून त्यांचेपैकी एकजन लॉजमध्ये जावुन फिर्यादी मेहता यांची खोली पाहुन आला होता परंतु रवि मेहता हे रूममध्ये नसल्याने त्यांना लुटण्याचा प्लॅन फेल गेला. त्यानंतर ते त्यांचे जवळील सोन्याच्या मोरणी व रोख रक्कम एका बॅगमध्ये घेवुन जात असताना आरोपी याने त्याचे इतर ४ साथीदारासह पिंपरी चौक येथुन बॅग जबरदस्तीने हिसकाऊन चोरून नेली असल्याचे उघड झाले आहे.

सदर तपासा दरम्यान अटक आरोपी याचेकडे तपास करता त्याने व त्याचे साथीदार यांनी दि.२४/१२/२०१९ रोजी डेक्कन होन्डाच्या समोर, पिंपरी येथे मित्राकडुन उसणे पैसे घेउन मुलाची शाळेची फी भरण्यासाठी जात असलेल्या एका ब्रेझा गाडी चालकास तुमच्या गाडीचा धक्का लागला आहे असे सांगुन त्यास थांबवुन त्याला गाडीतुन खाली उतरून त्याचेशी हुज्जत घालुन मागे असलेल्या साथीदारांनी गाडीची डाव्या बाजुची काच फोडुन सिटवर **३,००,०००/- रू रूपये** ठेवलेली निळ्या बॅग जबरदस्तीने चोरून नेल्याची कबुली दिली आहे. त्याबाबत माहिती घेता **पिंपरी पोलीस ठाणे गु.रजि.नं. १२१६/२०१९ भादवि कलम ३७९,४२७,३४** अन्वये दि.२५/१२/२०१९ रोजी फिर्यादी समीर थापर रा.मोशी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी वरून गुन्हा नोंद आहे.

आरोपी रोहीत ऊर्फ कालू दलपत घमंडे हा रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्यांचे व त्याचे वेगवेगळ्या साथीदारा विरूध्द राजस्थान, गुजराथ, हैंद्राबाद, औरंगाबाद येथे एकुण ५ गुन्हे दाखल असुन तो राजस्थान येथील जबरी चोरीच्या गुन्ह्या मध्ये फरार आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदिप बिष्णोई, सह पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली एस.आय.टी. पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे, सपोफौ सुभाष सावंत तसेच पोलीस कर्मचारी मंगेश गायकवाड, संतोष असवले, सोमनाथ बोऱ्हाडे, कबीर पिंजारी, विशाल भोईर, महादेव जावळे, नितीन खेसे, पंकज भदाने, प्रविण पाटील यांनी केली आहे.